आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१० मार्च २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर एलपीजी उत्पादन वाढवण्याचे सरकारचे आदेश, पेट्रोलियम पदार्थांसाठी एस्मा लागू

- लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यावरचा अविश्वास प्रस्ताव सादर

- राज्यातल्या ७५ टक्के शेतकऱ्यांना वर्षाखेरपर्यंत अखंड वीज पुरवठा करण्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन

- महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचा आज शपथविधी

**आणि**

- मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यांना आज उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी

**<><><><>**

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे इंधन पुरवठ्यात येणारे अडथळे आणि एलपीजी पुरवठ्याच्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर सरकारनं तेल शुद्धीकरण कारखान्यांना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे आदेश दिले आहेत. या अतिरिक्त उत्पादनाचा वापर घरगुती एलपीजी वापरासाठी करण्याचे आदेशही जारी केले आहेत. सरकारनं घरगुती एलपीजी पुरवठ्याला प्राधान्य दिलं असल्याचं, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने म्हटलं आहे. साठवणूक आणि काळाबाजार टाळण्यासाठी दोन सिलिंडरमधल्या नोंदणीचा कालावधी २५ दिवसांचा केला आहे.

**<><><><>**

पश्चिम आशियातल्या सध्याच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं नैसर्गिक वायूच्या उत्पादन, पुरवठा, समतोल वितरण आणि उपलब्धतेचे नियमन करण्यासाठी एस्मा अर्थात आवश्यक वस्तू अधिनियम १९५५ लागू केला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं जारी केलेल्या अधिसूचनेनुसार नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यासाठी काही क्षेत्रांना प्राधान्य दिलं आहे. यामध्ये CNG, PNG, एलपीजी उत्पादन यांचा समावेश केला आहे.

**<><><><>**

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्याविरुद्धचा अविश्वास प्रस्ताव आज लोकसभेत मांडण्यात आला. विरोधकांच्या गदारोळामुळे १२ वाजेपर्यंत तहकूब झालेलं सभागृहाचं कामकाज पुन्हा सुरु झाल्यावर काँग्रेसचे खासदार डॉक्टर मोहम्मद जावेद यांनी हा प्रस्ताव मांडला. सभापती बिर्ला यांनी विरोधी पक्षनेत्यांना सभागृहात बोलू दिलं नाही तसंच विरोधी पक्षाच्या महिला खासदारांबाबत असंसदीय वक्तव्य केलं, असा आरोप जावेद यांनी यावेळी केला. सदनाचं कामकाज चालवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निष्पक्ष दृष्टिकोनाचा अभाव बिर्ला यांच्या वागण्यात दिसून आला, असंही ते म्हणाले. सध्या लोकसभेत या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे.

<><><><><>

राज्यातल्या ७५ टक्के शेतकऱ्यांना वर्षअखेरपर्यंत अखंड वीज पुरवठा होईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिलं.

समाजमाध्यमावर कोणत्याही पुराव्याशिवाय बदनामीचे प्रकार थांबवण्यासाठी काय उपाययोजना करता येतील हे ठरवण्यासाठी पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाईल. कायद्यात बदल किंवा नवीन तरतुदी करण्याची आवश्यकता आहे का, यासंदर्भात समितीच्या शिफारशीनुसार निर्णय घेऊ असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. सायबर सुरक्षा जनजागृतीसाठी राज्य सरकारनं ४३ कोटींच्या निधीची तरतूद केली आहे. याशिवाय महा सायबर सेफ ॲप हे ॲप्लिकेशन सुरू करण्यात येणार आहे, असं गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितलं.

<><><><><>

राज्यावर अकरा लाख कोटींपेक्षा जास्त कर्जाचा बोजा असून राज्य प्रचंड कर्जात बुडत असल्याची टीका जयंत पाटील यांनी केली. अर्थसंकल्पावरील चर्चेत ते आज विधानसभेत बोलत होते. सरकारने ज्या घोषणा केल्या त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूदच नाही, मागणी नसताना मोठमोठे रस्ते बांधण्यात सरकारला रस असून नागरिकांना आवश्यक असणाऱ्या गोष्टी करण्यात नाही अशी टीका त्यांनी केली. यावेळी पाटील यांनी वेगवेगळ्या योजनांसाठीच्या निधीत केलेल्या कपातीची उदाहरणं सभागृहात सांगितली.

<><><><><>

भारत - युरोप करारामुळे इथल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांना तिथल्या शेतकऱ्यांसोबत स्पर्धा करावी लागेल. यात भारतीय शेतकरी टिकणार नाही असं सांगत पाटील यांनी या कराराला विरोध केला.

महाराष्ट्राचं स्थूल राज्यांअंतर्गत उत्पादन देशात सर्वात जास्त आहे. पण केवळ जीडीपी वाढणं म्हणजे विकास नाही, असं निलेश राणे या चर्चेदरम्यान म्हणाले. महसुली आणि राजकोषीय तूट कशी भरून काढणार हा राज्यापुढचा प्रश्न आहे. कर भरण्यात महाराष्ट्र आघाडीवर आहे मात्र केंद्राकडून परतावा मिळत नाही, असं राणे म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक संवर्गात एकंदर 11 हजार 918 जागा रिक्त असून त्यापैकी सुमारे साडे 5 हजार पदं भरायची मान्यता मिळालेली आहे, अशी माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिली. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तासिका तत्त्वावर प्राध्यापकांची नियुक्ती करायची गरज राहणार नाही, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.

केंद्र सरकारच्या किंमत स्थिरता निधी योजनेअंतर्गत कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून नाफेडने 1 लाख 37 हजार मेट्रिक टन आणि एनसीसीएफने 1 लाख 40 हजार मेट्रिक टन कांदा खरेदी करण्यात आला असून दिल्ली, आसाम तसंच इतर राज्यांमध्ये त्यांची विक्री झाली आहे, अशी माहिती मंत्री संजय सावकारे यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिली. अतिरिक्त कांदा पिकाचं काय करायचं हा मोठा प्रश्न असतो, त्यामुळे शेतकऱ्यांनी सलग कांद्याचं पीक घेऊ नये, मध्ये वेगळं पीक घ्यावं, यासाठी जनजागृती करण्यात येत आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या रत्नापूर इथले राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते सूर्यकांत मोरे यांना विशेषाधिकार आणि अवमान प्रकरणी 30 दिवसांच्या दिवाणी कारावासाच्या शिक्षेची शिफारस विधानपरिषद विशेषाधिकार समितीनं केली आहे. या समितीचा अहवाल प्रसाद लाड यांनी सभागृहात सादर केला.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिका क्षेत्रातल्या शासकीय महिला कर्मचारी 'Come Early, Go Early' या संकल्पनेनुसार सकाळी सव्वा 9 ते पावणे दहा या कालावधीत कार्यालयात लवकर येऊन जितकी मिनिटं काम करतील, तितकी मिनिटं लवकर कार्यालयातून निघण्याची, म्हणजे 30 मिनिटांची सवलत देण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याची घोषणा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज विधानपरिषदेत केली. या निर्णयामुळे गर्दीच्या वेळी होणारी महिलांची गैरसोय कमी व्हायला मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने सभागृहात झालेल्या चर्चेला त्या उत्तर देत होत्या.

या चर्चेदरम्यान सर्व सदस्यांनी मांडलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार सरकार करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

<><><><><>

महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचा शपथविधी समारंभ आज मुंबईत लोकभवन इथं दुपारी साडे चार वाजता होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर, हे वर्मा यांना पदाची शपथ देतील.

<><><><><>

मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्याला आज उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. रायगड जिल्ह्याला उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट असल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे. या चारही जिल्ह्यांना उद्यासाठी उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर अकोला आणि अमरावती जिल्ह्यांनाही उद्यापर्यंत यलो अलर्ट दिला आहे. येत्या काही दिवसांत विदर्भातही उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

<><><><><>

देशात समान नागरी कायदा लागू करण्याची वेळ आता आली आहे, असं मत आज सर्वोच्च न्यायालयानं व्यक्त केलं. शरियत कायद्यातल्या तरतुदी मुस्लिम महिलांसाठी भेदभाव निर्माण करणाऱ्या असल्यानं त्या रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली त्यावेळी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठानं हे मत व्यक्त केलं. न्यायालयानं शरियत कायदा रद्द केला तर कायदेशीर पोकळी निर्माण होईल, असं त्यांनी नमूद केलं.

<><><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघावर बक्षिसांचा वर्षाव होत आहे. बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून या संघाला १३१ कोटी रुपयांच्या रोख बक्षिसाची घोषणा करण्यात आली आहे. संघाचे १५ खेळाडू, प्रशिक्षक कर्मचारी आणि इतर सहाय्यकांचा त्यात समावेश आहे. यापूर्वी २०२४मध्ये रोहित शर्मा याच्या नेतृत्वाखालील संघाने जिंकलेल्या विश्वचषकासाठी त्यांना १२५ कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

//<><><><><>//